# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः20.12.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान आज पश्चिम बंगाल आणि आसाम दौऱ्यावर
2. पारंपरिक औषधांची चिकित्सा पद्धती सिद्ध करण्यासाठी विज्ञानाच्या माध्यमातून लोकांचा विश्वास जिंकण्याचं पंतप्रधानांचं आवाहन
3. गेल्या 11 वर्षांत आधुनिक पायाभूत सुविधा विकासामध्ये लक्षणीय प्रगती झाल्याचं केंद्रिय सहकार मंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
4. केंद्रिय शिक्षण मंत्रालयाचा राष्ट्रीय कला उत्सव यावर्षी पुण्यात होणार आणि
5. 19 वर्षांखालील मुलांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय संघ अंतिम फेरीत दाखल, उद्या पाकिस्तानविरुद्ध होणार अंतिम सामना

**<u>पंतप्रधान- प.बंगाल</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीत ते नदिया जिल्ह्यातील राणाघाट इथं सुमारे 32 शे कोटी रुपयांच्या विकासकामांचं भूमिपूजन आणि उद्घाटन करणार आहेत. महामार्ग आणि रस्ते प्रकल्पांचा यामध्ये समावेश आहे.

**<u>पंतप्रधान-आसाम</u>**

पश्चिम बंगालनंतर पंतप्रधान दोन दिवसांच्या आसाम दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते सुमारे 15 हजार 600 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. पंतप्रधान आज गुवाहाटी इथल्या लोकप्रिय गोपीनाथ बोरदोलोई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अत्याधुनिक बांबू बाग टर्मिनल इमारतीचं उद्घाटन करतील. 'बांबू बाग' या विषयाला वाहिलेल्या या  टर्मिनलद्वारा आसामची जैवविविधता आणि सांस्कृतिक वारसा प्रतिबिंबित होतो.

**<u>राष्ट्रपती</u>**

बदलत्या तंत्रज्ञानातली आव्हानं ओळखून जागतिक दर्जाचे सनदी अधिकारी घडवण्यावर लोकसेवा आयोगानं लक्ष केंद्रित करावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. हैद्राबादमध्ये आयोजित देशातल्या लोकसेवा आयोगांच्या अध्यक्षांच्या राष्ट्रीय परिषदेचं उदघाटन करताना त्या काल बोलत होत्या. तेलंगणचे राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांनी सनदी अधिकाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि भरती वेळापत्रक काटेकोरपणे राबविण्यावर भर दिला.

**<u>संसद</u>**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचा काल समारोप झाला. या अधिवेशनात सभागृहाच्या 15 बैठका झाल्या आणि त्यात 111 टक्के विधायक कामकाज झालं अशी माहिती लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभेमध्ये दिली. राज्यसभेत सभागृहाच्या कामकाजात वारंवार व्यत्यय येत असल्याबद्दल नाराजी व्यक्त करुन सदस्यांनी आत्मपरीक्षण करावं, असं आवाहन अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. सभागृहात 92 तास प्रत्यक्ष कामकाज झाल्याचं ते म्हणाले. या हिवाळी अधिवेशनात विकसित भारत रोजगार हमी उपजीविका विधेयक, शांती विधेयक, विमा सुधारणा विधेयक तसंच निरसन आणि सुधारणा विधेयक यासारखी महत्त्वाची विधेयकं मंजूर झाली.

**मोदी-आयुष**

पारंपरिक औषधांची चिकित्सा पद्धती सिद्ध करण्यासाठी विज्ञानाच्या माध्यमातून लोकांचा विश्वास जिंकण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्फत नवी दिल्ली इथं आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या जागतिक पारंपरिक औषध शिखर परिषदेच्या समारोप सत्रात अध्यक्षपदावरून मोदी बोलत होते. ते म्हणाले....

**प्राचीन परंपरा के साथ युवा शक्ति जुड़ रही है। इन सभी प्रयासों से ट्रेडिशनल मेडिसिन एक नई ऊंचाई की तरफ बढ़ती दिख रही है। साथियों आज पारंपरिक चिकित्सा एक निर्णायक मोड़ पर खड़ी है। दुनिया की बड़ी आबादी लंबे समय से इसका सहयोग लेती आई है लेकिन फिर भी पारंपरिक चिकित्सा को वो स्थान नहीं मिल पाया है। था जितना उसमें सामर्थ्य है। इसलिए हमें विज्ञान के माध्यम से भरोसा जीतना होगा। हमें उसकी पहुंच को और व्यापक बनाना होगा। ये जिम्मेदारी किसी एक देश की नहीं है। ये हम सबका साझा दायित्व है। आइए हम संकल्प लें कि पारंपरिक चिकित्सा को विश्वास, सम्मान और जिम्मेदारी के साथ मिलकर के आगे बढ़ाएंगे।**

यावेळी मोदी यांच्या हस्ते आयुष एकात्मिक पोर्टल आणि आयुष मार्कचं उद्घाटन झालं. या कार्यक्रमात 2021 ते 2025 या काळात योग प्रसार आणि विकासामध्ये उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींना पंतप्रधानांच्या  हस्ते पुरस्कार देण्यात आले.

**अमित शहा**

गेल्या 11 वर्षांत आधुनिक पायाभूत सुविधा विकसित करण्यामधे लक्षणीय प्रगती झाल्याचं केंद्रिय सहकार मंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. क्रेडाई या बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेच्या राष्ट्रीय परिषदेत ते काल नवी दिल्लीत बोलत होते. भारतमाला, सागरमाला आणि पर्वतमाला या प्रकल्पांनी शहरी विकासाला बळकटी दिली आहे. या प्रकल्पांनी उत्तम पायाभूत सुविधा असलेल्या जगातील आघाडीच्या देशांपैकी एक ठरण्याचा मार्ग आखून दिला आहे असं शहा म्हणाले. शहरी विकासाचा महत्त्वांकांक्षी आणि भविष्यवेधी दृष्टीकोन सरकारनं स्वीकारला असून सार्वजनिक स्थावर मालमत्ता विकासाला प्राधान्य दिलं जात आहे असं त्यांनी सांगितलं. केंद्रिय वन, पर्यावरण आणि हवामान बदल मंत्री भूपेंदर यादव या कार्यक्रमाला उपस्थित होते. देशाचा आर्थिक विकास, शहरांचं भविष्य आणि चांगलं राहणीमान वास्तवात आणण्यासाठी बांधकाम क्षेत्राची भूमिका महत्त्वाची असल्याचं यादव यावेळी म्हणाले.

**राष्ट्रीय कला उत्सव**

केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचा महत्त्वपूर्ण उपक्रम असलेला 'राष्ट्रीय कला उत्सव 2025' यावर्षी पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. उद्यापासून 23 डिसेंबरपर्यंत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी म्हणजेच यशदा इथं हा उत्सव होणार आहे. शिक्षण अधिक सर्जनशील आणि आनंददायी बनवण्याच्या उद्देशानं भरवण्यात येत असलेल्या या उत्सवात देशातील सर्व राज्यं, केंद्रशासित प्रदेशांसह केंद्रीय विद्यालयं, नवोदय विद्यालयं आणि एकलव्य मॉडेल निवासी शाळांमधील विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी होणार आहेत. गायन, वादन, नृत्य, नाटक, दृश्यकला, पारंपरिक कथाकथन अशा 12 विविध कला प्रकारांचं सादरीकरण यामध्ये होणार आहे.

**सीमा दल स्थापना दिन**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज सशस्त्र सीमा दलाच्या स्थापना दिनानिमित्त सशस्त्र सीमा दलाच्या कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या सीमांचे रक्षण करण्यापासून ते संकटाच्या काळात नागरिकांच्या खांद्याला खांदा लावून उभे राहण्यापर्यंत, सशस्त्र सीमा दलानं नेहमीच देशासाठी अभिमानास्पद कामगिरी केल्याचं शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**मार्गदर्शक सूचना**

धुक्यामुळं आणि अपुऱ्या दृश्यमानतेमुळं विमानसेवा विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सोईसाठी केलेल्या नियमावलीचं काटेकोर पालन करावं तसंच विमानतळावर पुरेसे कर्मचारी असल्याची खबरदारी घ्यावी असे आदेश केंद्र सरकारनं

विमान कंपन्यांना दिले आहेत. विमानांच्या उड्डाणाबाबत प्रवाशांना वेळेत, अचूक माहिती द्यावी. विमानांना विलंब झाल्यास जेवण आणि खाद्यपदार्थ पुरवावेत तसंच पुन्हा आरक्षण देण्याची किंवा तिकीट रद्द केल्यास पैसे परत देण्याची व्यवस्था करावी अशा सूचना सरकारनं दिल्या आहेत. संलग्न विमानसेवा, सामान हाताळणी तसंच लहान मुलांची काळजी घेण्याबाबत प्रवाशांसोबत सुस्पष्ट संवाद साधावा असंही सरकारनं सांगितलं आहे.

**नेपाळ निवडणूक**

नेपाळचे राष्ट्राध्यक्ष रामचंद्र पौडेल यांनी काल संसदेच्या निवडणुकीबाबतचा सुधारित अध्यादेश जारी केला. मंत्रीमंडळाच्या शिफारसीनुसार हा अध्यादेश काढण्यात आल्याची माहिती राष्ट्राध्यक्षांचे प्रवक्ते प्रदीप कुमार यांनी दिली. 2021 च्या जनगणनेनुसार विविध जातीजमातींच्या लोकसंख्येनुसार त्यांना संसदेत आरक्षण दिलं जाईल असं या अध्यादेशात म्हटलं आहे.

**करार**

भारत आणि नेदरलँडस यांनी संयुक्त व्यापार आणि गुंतवणूक समितीच्या स्थापनेची घोषणा केली आहे. यासाठी दोन्ही देशांमध्ये एक सामंजस्य करार करण्यात आला असून दोन्ही देशांमधल्या व्यापार, गुंतवणूक आणि आर्थिक सहकार्य वाढीसाठी हा करार महत्त्वाचा टप्पा ठरेल.

**क्रिकेट आशिया कप**

19 वर्षांखालील मुलांच्या आशिया करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतानं उपांत्य सामन्यात श्रीलंकेला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पावसामुळं कालचा उपांत्य सामना 20 षटकांचा झाला. श्रीलंकेनं विजयासाठी दिलेलं 139 धावांचं आव्हान भारतीय संघानं 18 व्या षटकात केवळ दोन गडी गमावून पूर्ण केलं. दुसऱ्या उपांत्य सामन्यात पाकिस्तानच्या संघानं बांग्लादेशवर आठ गडी राखून विजय मिळवला. अंतिम फेरीचा सामना भारत आणि पाकिस्तान यांच्यात उद्या दुबईत खेळला जाणार आहे.

**क्रिकेट**

दक्षिण अफ्रिकेविरुद्धची वीस षटकांच्या सामन्यांची क्रिकेट मालिका भारतानं 3-1 अशी जिंकली. काल अहमदाबाद इथं झालेल्या पाचव्या सामन्यात भारतानं दक्षिण अफ्रिकेवर 30 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना भारताच्या संघानं 20 षटकांत 231 धावा केल्या. तिलक वर्मानं 73 तर हार्दिक पांड्यानं 63 धावा केल्या. हार्दिक पांड्यानं केवळ 16 चेंडूत अर्धशतक ठोकलं. विजयासाठी आवश्यक 232 धावांचा पाठलाग करताना दक्षिण अफ्रिकेचा संघ 20 षटकांत 201 धावा करू शकला. वरुण चक्रवर्तीनं पाहुण्या संघाचे चार फलंदाज बाद केले. हार्दिक पांड्या सामनावीर तर वरुण चक्रवर्ती मालिकावीर ठरला.

**हवामान**

आज बिहार, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये अतीदाट धुक्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. ईशान्येकडील राज्यं आणि झारखंड, ओडिशा, पंजाब, सिक्कीम, पश्चिम बंगाल राज्यातही दाट धुकं असेल. कर्नाटक आणि तेलंगण राज्यात थंडीची लाट येईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.